# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन",सेंटजॉर्जेस रुग्णालयाचे आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय<br>संचालक (वैयक्तिक ) | दूरध्वनी<br>२२६२१००६<br>२२६२०२९२ | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Fax No. 022-22620234 (DHS) 3841-4041 |
|---|---|---|
| **आरोग्य सेवा** | | क्र.संआसे/संचा.कक्ष/मिनी लॅप/ /२०१५<br>दिनांक: २३/०४/२०१५ |


प्रति

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद................(सर्व)
२) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय.................(सर्व)
३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालीका.............(सर्व)
४) कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
५) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय..............(सर्व)

विषयः- मिनी लॅप पध्दतीने स्त्री कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर लाभार्थ्यास रुग्णालयातून डिस्चार्ज करण्याचा कालावधी मध्ये बदल करणेबाबत.

संदर्भः- Reference Manual for Female Sterilization, November 2014

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात केंद्रशासनाकडून नविन मार्गदर्शक पुस्तिका (मोडयुल) Reference Manual for Female Sterilization November 2014 मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे.

सदर मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये स्त्री कुटुंब कल्याण शस्त्रक्रिये संदर्भात मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सध्या राज्यात स्त्री कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झाल्यानंतर लाभार्थ्यास सातव्या दिवशी डिस्चार्ज देण्यात येतो. केंद्र सरकारच्या नवीन मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झाल्यानंतर लाभार्थ्यांस डिस्चार्ज करण्याचा कालावधी कमी करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी एक तज्ञ समिती अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण) पुणे यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीमध्ये मिनीलॅप पध्दतीने करण्यात येणाऱ्या स्त्री कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेच्या लाभार्थ्यांबाबत सध्या प्रचलित असलेला सात दिवसाचा कालावधी कमी करण्यात येवून शस्त्रक्रियेनंतर तिसऱ्या दिवशी लाभार्थ्यास डिस्चार्ज करण्याचा कालावधी निश्चित करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुढील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

## १) <u>मिनी लॅप पध्दतीने शस्त्रक्रिया झाल्यानंतर डिस्चार्ज करण्याचा कालावधी</u>

- मिनी लॅप पध्दतीने स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया झाल्यानंतर सध्या प्रचलित असलेला सात दिवसांचा कालावधी कमी करुन तो तीन दिवस एवढा निश्चित करण्यात आला आहे.
- शस्त्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर किमान ४८ तास लाभार्थ्यांस रुग्णालयात ठेवण्यात यावे व शस्त्रक्रियेनंतर तिस-या दिवशी लाभार्थ्यांस डिस्चार्ज देण्यात यावा.

## २) <u>कोणत्या शस्त्रक्रियेसाठी लागू आहे व कोणत्या शस्त्रक्रियेसाठी लागू नाहीः</u>

- मिनी लॅप पध्दतीने स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया झालेल्या लाभार्थ्यांसाठीच वरील पध्दती अवलंबविण्यात यावी.
- ज्या लाभार्थ्यांना कोणत्याही कारणाने पाचव्या दिवसाची तपासणी शक्य नसेल अशा लाभार्थ्यांना तिसऱ्या दिवशी डिस्चार्ज देऊ नये. यातील इतर कारणे मुदद्-७ मध्ये नमूद आहेत.

- सिझेरीयन शस्त्रक्रियेसोबत अथवा वैद्यकिय गर्भपातानंतर स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया केली असल्यास अशा लाभार्थ्यांसाठी पूर्वीप्रमाणेच डिस्चार्ज कालावधी हा ७ दिवसांचा अथवा मुख्य शस्त्रक्रियेनुसार राहील.
- लाभार्थ्यास कोणत्याही स्वरुपाच्या गुंतागुंतीची शक्यता वाटल्यास डिस्चार्ज देऊ नये.

## ३) स्त्री नसबंदी लाभार्थींना शस्त्रक्रियेनंतर व डिस्चार्ज देण्यापूर्वी तपासण्याः

- आरोग्य संस्थांमध्ये लाभार्थी दाखल असताना शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्याची दिलेल्या सूचनानुसार तपासणी करण्यात यावी.
- शस्त्रक्रिया झाल्यानंतर दर १५ मिनिटांनी पहिल्या तासामध्ये व त्यानंतर दर अर्ध्या तासाने पुढील २ तासासाठी लाभार्थ्याची तपासणी वैद्यकिय अधिकाऱ्यांनी करावी. त्यानंतर दिवसातुन किमान दोन वेळा नियमित राऊंडच्या वेळी वैद्यकिय अधिकाऱ्यांनी लाभार्थ्याची तपासणी करावी.
- या तपासणीमध्ये लाभार्थ्याच्या व्हायटल साईन्स तसेच पोटावरुन तपासणी करावी.
- लाभार्थ्यास डिस्चार्ज देण्यापूर्वी वैद्यकीय अधिकारी यांनी पुढील बार्बीची Vital signs are stable and client is fully awake, has passed urine, stool and can talk, drink and walk इत्यादि खात्री करावी.
- याबाबत कांही शंका असल्यास किंवा लाभार्थ्यांस काही गुंतागुंत असल्यास डिस्चार्ज देण्यात येवू नये. आवश्यकता वाटल्यास शस्त्रक्रिया केलेल्या सर्जनला याबाबत माहिती द्यावी. आणि आवश्यकता असल्यास लाभार्थ्यांस वरीष्ठ संस्थेकडे संदर्भीत करण्यात यावे.

## ४) लाभार्थ्यांस डिस्चार्ज करताना घ्यावयाची काळजीः

- सर्व लाभार्थ्यांना त्यांचे Post-Operative Instruction Card देण्यात यावे.
- लाभार्थ्यास डिस्चार्ज दिल्यानंतर लाभार्थी घरी जाताना त्याच्या सोबत जबाबदार प्रौढ व्यक्ती असल्याची खात्री करावी.
- आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांस घरी घेण्यासाठी औषधी (Oral medicines i.e. Analgesics, Antibiotics and other Oral medicines) देण्यात यावीत.
- लाभार्थ्याला व लाभार्थ्याच्या सोबत असलेल्या नातेवाईकाला शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाच्या काळजीबाबत सविस्तरपणे समजावून सांगावे व त्याची एक लेखी प्रत देखील लाभार्थ्याला द्यावी (Post-Operative Instruction Card - Annexure-3 of Standards and Quality Assurance in Sterilization Services booklet)
- शस्त्रक्रियेपूर्वी घ्यावयाच्या संमतीपत्रकावर लाभार्थ्याच्या अथवा त्यांचे नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक किंवा दूरध्वनी क्रमांक नमूद करावा. तसेच लाभार्थ्यास डिस्चार्ज देतांना Post-Operative Instruction Card वर वैद्यकिय अधिकारी अथवा शस्त्रक्रिया करणारे सर्जन यांचा मोबाईल क्रमांक नमूद करावा.

## ५) लाभार्थ्यांस डिस्चार्ज केल्यानंतरचा पाठपुरावा व तपासण्याः

- लाभार्थी घरी गेल्यानंतर शस्त्रक्रियेच्या पाचव्या दिवशी लाभार्थ्यांची तपासणी करण्यात यावी, ही तपासणी ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेविका / आशा कार्यकर्ती व आरोग्य सेवक यांनी लाभार्थ्यांच्या घरी जाऊन करावी.
- यावेळी लाभार्थ्यास ताप आला नसल्याची, पोटात दुखत नसल्याची तसेच उलटया होत नसल्याची खात्री करावी. लाभार्थ्यास अशा तक्रारी असल्यास त्वरीत संबंधीत वैद्यकिय अधिकाऱ्यांना कळवावे व १०८ ला दुरध्वनी करुन ॲम्ब्युलन्स बोलवावी.
- शहरी भागामध्ये शस्त्रक्रियेच्या लिंक वर्कर किंवा समकक्ष कर्मचा-यांने सदर पाठपुरावा करावा.
- आवश्यकता असल्यास या पेक्षा जास्त वेळासुध्दा संबंधीत कर्मचाऱ्यांनी घरी जावून लाभार्थ्याची तपासणी करावी.

- या पाठपुराव्याच्या वेळी लाभार्थ्याच्या तक्रारी असल्यास कर्मचाऱ्यांनी किरकोळ बाबीसाठी त्यांच्या स्तरावर उपचार करावा व आवश्यकता भासल्यास वैद्यकिय अधिकाऱ्यांकडे संदर्भीत करावे.
- गुंतागुंतीच्या रुग्णांना संदर्भित करताना १०८ रुग्णवाहिकेचा वापर करावा.

## ६) शस्त्रक्रियेनंतर टाके काढणे:

- शस्त्रक्रियेच्या सातव्या दिवशी लाभार्थीस टाके काढण्यासाठी ज्या संस्थेमध्ये शस्त्रक्रिया झाली त्या संस्थेमध्ये बोलवावे, ही संस्था दूर असल्यास लाभार्थ्याच्या सोयीनुसार जवळच्या संस्थेमध्ये जाण्यास हरकत नसावी.
- लाभार्थ्याच्या वाहतुकीसाठी शासकिय वाहनाचा वापर करावा.
- टाके काढल्यानंतरच प्रवर्तकाचे मानधन अदा करावे.

## ७) तीन दिवसानंतर खालील लाभार्थ्यांना डिस्चार्ज करु नये:

- शस्त्रक्रियेनंतर ७ दिवस रहाण्याची इच्छा व्यक्त करणारे लाभार्थी.
- अतिदूर्गम भागामध्ये व अंतर जास्त असलेल्या ठिकाणी राहणारे लाभार्थी.
- आरोग्य सेविका व आरोग्य सेवकाचे पद रिक्त असलेल्या गावाचे लाभार्थी.
- पावसाळयामध्ये ज्या गावांचा संपर्क तुटतो अशा गावी राहणारे लाभार्थी.
- भटके व ज्यांना निश्चित राहण्याचे ठिकाण नाही असे लाभार्थी.
- वर नमूद केल्यानुसार व इतरही काही कारणासाठी वैद्यकिय अधिकाऱ्यास वाटल्यास लाभार्थ्यांना तिसऱ्या दिवशी डिस्चार्ज करण्यात येवू नये.

## ८) तिसऱ्या दिवशी डिस्चार्ज करतांना रुग्णालयाने अवलंबावयाची पध्दती:

- जिल्हा रुग्णालय अथवा इतर रुग्णालयामधील मिनीलॅप स्त्री नसबंदी शस्त्रक्रियाच्या लाभार्थ्यांना डिस्चार्ज करतांना त्यांचे वास्तव्याचे ठिकाण ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये आहे. तेथील वैद्यकिय अधिकाऱ्यांना याबाबत पत्र देण्यात यावे.
- जिल्हा मुख्यालयातील आरसीएच अधिकारी तसेच कुटुंब कल्याण पर्यवेक्षक यांना याबाबत लेखी सूचना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे इतर संबंधीतांना लेखी कळविण्यात यावे.
- जे लाभार्थी शस्त्रक्रीयेनंतर कार्यक्षेत्राबाहेर जाणार आहेत, असे लाभार्थी पाचव्या दिवशी कोठे असणार याची माहिती घेवुन त्या ठिकाणच्या संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना लेखी/ ई-मेल व एस.एम.एस द्वारे कळवावे. यामुळे लाभार्थीचा पाठपुरावा होण्यासाठी मदत होईल.

या सर्व मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

२/५/१५

**संचालक आरोग्य सेवा,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**प्रत कार्यवाहीस्तव:** उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळे (सर्व)

**प्रत अग्रेषित:** संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

**प्रत माहितीस्तव:**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ......(सर्व)
२) जिल्हाधिकारी, जिल्हा.........................(सर्व)

**प्रत सविनय सादर:**

१) मा.आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई